सैय्यद फकरुल इस्लाम

-विरुद्ध-

महाराष्ट्र राज्य रस्ते वाहतूक (परिवहन)महामंडळ आणि इतर.

( २६ एप्रिल,२००२)

[सर्वश्री न्या.सय्यद शाह मोहम्मद कादरी आणि न्या. एस. एन. वरियावा.]

नोकरी कायदाः-

कर्मचारी-तात्पुरती पदोन्नती-पुनर्वसन आदेश-थेटभरती क्षेत्रातील रिक्त पदांसाठी तात्पुरती पदोन्नती मिळालेल्या कर्मचाऱ्यांच्या नेमणूकीची वैधता-अशी अट की, थेट भरती क्षेत्रातील उमेदवार उपलब्ध झाल्यास, त्याला विभागीय पदोन्नती समितीने विचारात घेतलेल्या मूळ पदावर परत पाठविले जाईल- अपीलकर्ता पदोन्नतीसाठी अयोग्य असल्याचे आढळून आले-सबब,पदावनतीचा आदेश वैध ठरला- सदर पदावनती ही, महाराष्ट्र राज्य रस्ते परिवहन महामंडळाच्या स्थायी आदेश ३२चे उल्लंघन करणारी नाही,हा प्रतिवादींचा निर्णय न्यायालयाने कायदेशीर व योग्य ठरविला.

प्रतिवादी-वाहतूक महामंडळातील वरिष्ठ निरीक्षक असलेल्या अपीलकर्त्याला डेपो व्यवस्थापक 'अ' म्हणून तात्पुरती पदोन्नती देण्यात आली होती आणि त्यानंतर त्याला त्याच्या

मूळ पदावर परत पाठवण्यात आले.त्याच्या पदोन्नतीच्या आदेशात, विशेषतः अशी तरतूद होती की, त्याची पदोन्नती थेटभरती क्षेत्रातील रिक्त पदाच्या जागी केलेली होती आणि थेटभरती क्षेत्रातील उमेदवार उपलब्ध झाल्यास त्याला त्याच्या मूळ पदावर परत पाठवले जाईल, असे आदेशात नमूद केले होते.अपीलकर्त्याने मुंबई उच्च न्यायालयामध्ये पदावनतीच्या आदेशाच्या वैधतेवर आक्षेप घेतला होता.

सदर अपीलात अपीलकर्त्यांतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, डेपो व्यवस्थापक 'अ' चे पद नियमितपणे भरले जात नसल्यामुळे, महाराष्ट्र राज्य रस्ते परिवहन महामंडळाच्या स्थायी आदेश ३२, अंतर्गत अपीलकर्त्याला त्या पदावर तात्पुरते कार्यरत राहण्याचा अधिकार आहे.प्रतिवादी महामंडळाने आपल्या एका प्रतिज्ञापत्रात असे म्हटले आहे की, विभागीय पदोन्नती समितीने अपीलकर्त्यांचा विचार केला होता ,परंतु: तो पदोन्नतीसाठी योग्य आढळला नाही.सबब त्याला त्याच्या मूळ पदावर परत पाठवण्यात आले.

अपील फेटाळतांना न्यायालयाने निष्कर्ष काढला की,

1 .उच्च न्यायालयाच्या आक्षेपीत आदेशात बेकायदेशीर असे काहीही नाही.महाराष्ट्र राज्य रस्ते परिवहन महामंडळाच्या स्थायी आदेश ३२ अंतर्गत तात्पुरत्या नियुक्त केलेल्या उमेदवाराला दिलेला अधिकार असा आहे की, नव्याने प्रयत्न करूनही थेट भरती द्वारे उमेदवार उपलब्ध होत नसेल, तर त्याला नियमित पदोन्नतीसाठी विचारात घेतले पाहिजे.अपीलकर्त्याचा खरे तर नियमित पदोन्नतीसाठी विचार करण्यात आला. परंतु; तो त्यासाठी योग्य आढळला नाही. सबब, त्याची पदावनती करुन त्याला मूळ पदावर पाठविण्याची उत्तरवादीची कृती, ही स्थायी आदेश ३२ (अ) चे उल्लंघन असल्याचे म्हटले जाऊ शकत नाही.तथापि, कायद्यानुसार

भविष्यात उक्त पदावर पदोन्नतीसाठी त्याच्या प्रकरणाचा विचार करण्या पासून अधिकाऱ्यांना हा आदेश रोखू शकत नाही. [४६६- जी-एच; ४६७अ]

दिवाणी अपील अधिकारिता: दिवाणी अपील क्रमांक २९३७/२००२;

रिट याचिका क्रमांक ३२१६/१९९८ मधील मुंबई उच्च न्यायालयाचा दि. ६-४-२००० चा न्यायनिर्णय आणि आदेशा विरुद्ध दाखल अपील.

अपीलकर्त्यासाठी अधिवक्ता: ए. के. सांघी.

उत्तरवादींसाठी अधिवक्ता: अतिरिक्त महान्यायअभिकर्ता सर्वश्री आफताब अहमद,आर. एस. हेगडे, एस. शर्मा, प्रशांत जैन आणि पी. पी. सिंग .

न्यायालयाचा न्यायनिर्णय पारीत :-

-द्वारा- - न्या.सय्यद शाह मोहम्मद कादरी-

अनुमती देण्यात आली.

मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर दि.६एप्रिल, २००० रोजी दाखल केलेल्या रिट याचिका क्र.३२१६/९८ मध्ये पारीत आदेशाला, प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्त्याने आव्हान दिले आहे. अपीलकर्त्याने दाखल केलेली रिट याचिका उच्च न्यायालयाने फेटाळली होती.

अपीलकर्त्याची तक्रार समजून घेण्यासाठी, त्याला रिट याचिका कां दाखल करावी लागली, त्या घटनाक्रमाची थोडक्यात नोंद घेता येईल.४ जुलै १९७५ रोजी, अपीलकर्त्याची

सुरुवातीला पहिल्या उत्तरवादी द्वारे, लिपिक म्हणून आणि त्यानंतर जून 1979 मध्ये थेट क्षेत्रातील सहाय्यक बांधकाम अधीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली.त्यांनी पदोन्नतीची परीक्षा उत्तीर्ण केली आणि जुलै १९८५ मध्ये तो  डेपो व्यवस्थापक 'अ'/सहाय्यक यांत्रिक अभियंता या पदाच्या पदोन्नतीसाठी  पात्र ठरला.५ सप्टेंबर, १९९४ रोजी त्याला दुय्यम/ कनिष्ठ श्रेणीतील , व्यवस्थापक 'अ' कनिष्ठ (एम)/सहाय्यक यांत्रिक अभियंता म्हणून तात्पुरती पदोन्नती देण्यात आली.तथापि,२८ ऑगस्ट १९९८ रोजी त्यांना वरिष्ठ फोरमन या त्यांच्या मूळ पदावर परत पाठविण्यात आले.अपीलकर्त्याने उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करुन सदर पदावनतीच्या आदेशाच्या वैधतेवर आक्षेप घेतला.आक्षेपीत आदेशाद्वारे ही रिट याचिका फेटाळण्यात आली.

अपीलकर्त्याचे वकील श्री. ए. के. सांघी यांनी असा युक्तिवाद केला की, डेपो व्यवस्थापक 'ए' चे पद नियमितपणे भरले जात नसल्यामुळे, अपीलकर्त्याला सदरच्या पदोन्नतीच्या अटींचा विचार करता, उक्त पदावर तात्पुरते काम करण्याचा अधिकार आहे.अपिलार्थीच्या पदोन्नती च्या आदेशातील अटींचा या ठिकाणी संदर्भ घेणे उचित ठरेल. अपीलार्थींचा पदोन्नतीचा आदेश खालीलप्रमाणे आहेः

" १९९४ चा सामान्य आस्थापना आदेश क्रमांक ३२५ (एस. बी.)

पुढील वरीष्ठ फोरमन/सहाय्यक बांधकाम अधीक्षकांना डेपो व्यवस्थापक (अ) कनिष्ठ (एम)/सहाय्यक  यांत्रिक अभियंता,वर्ग-२, कनिष्ठ श्रेणी रु.२२००-३७००,या पदावर तात्पुरती

पदोन्नती देण्यात येते आणि पदोन्नती नंतर, त्यांच्या नावांसमोर नमूद केलेल्या प्रदेशांमध्ये पदोन्नतीच्या पदावर त्यांच्या नावासमोर रकाना-४ मध्ये खाली नमूद तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे प्रस्थापित केले जाते:-

| अनु.क्र. | नांव आणि पद | सध्याची नेमणूकीची जागा | पदोन्नती नंतरचा विभाग. |
|---|---|---|---|
| १ते१४. - | *** | *** *** | *** *** |
| 15 | श्री. आय. एस. फकरुल वरीष्ठ फोरमन | वर्धा उपविभाग | अमरावती विभाग |
| १६ ते १८ | *** *** | *** *** *** | *** *** *** |

२. वरील सहाय्यक बांधकाम अधीक्षकांन/वरिष्ठ फोरमन यांची पदोन्नती तात्पुरती आहे आणि इतरांच्या ज्येष्ठतेला या आदेशामुळे बाधा येणार नाही.त्यांना इतरां पेक्षा सेवा ज्येष्ठता, सातत्य किंवा प्राधान्याचा कोणताही अधिकार असणार नाही,या अटीवर  वरील सहाय्यक बांधकाम अधिक्षक./फोरमन यांना पदोन्नती दिली जाते.

३. थेट क्षेत्रातील रिक्त पदांच्या अनुषंगाने ही पदोन्नती असून, उमेदवारांच्या उपलब्धते नुसार, त्यांना त्यांच्या मूळ पदांवर परत पाठवले जाईल.

४ ते ६ पर्यंत.           ******                    *******-                ******

स्वाक्षरी/ - अस्पष्ट.

उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालकांसाठी

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

नं. एसटी/ईएसटी/एसबी/१६७५

दि. ५ सप्टेंबर,१९९४ ".

-----------------------------------------------------------------------------------------------

वरील कलम अनु क्र.(२) च्या परीक्षणावरून हे स्पष्ट होते की, अपीलकर्ता हा तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती वर होता.कलम (३) दर्शविते की पदोन्नती ही थेट क्षेत्रातील रिक्त पदांच्या संदर्भात होती आणि थेट क्षेत्रातील उमेदवारांच्या उपलब्धतेवर त्याला त्याच्या मूळ पदावर परत पाठवले जाईल,या अटीच्या अधिन राहून देण्यात आली होती.

स्थायी आदेश ३२ महाराष्ट्र  राज्य मार्ग परिवहन महामंडळ या नियमा अंतर्गत अपीलकर्ता सदर पदावर थेट भरती होईपर्यंत कार्यरत राहण्यासाठी पात्र आहे,असा अपीलार्थीचा मुख्य युक्तिवादाचा मुद्दा आहे.स्थायी आदेश ३२(अ) मध्ये खालील अटीं नमूद केलेल्या आहेत:-

" 32 ( अ).जेव्हा थेट भरतीसाठी राखीव असलेल्या पदासाठी थेट भरतीसाठी योग्य उमेदवार उपलब्ध नसेल, तेव्हा योग्य विभागीय उमेदवाराला, नियुक्तीसाठी  थेट भरती द्वारे योग्य उमेदवार उपलब्ध होईपर्यंत, पूर्णपणे तात्पुरती पदोन्नती दिली जाऊ शकते.पदाची पुन्हा

जाहिरात करून  थेट भरती द्वारे योग्य उमेदवार मिळवण्याचा नव्याने प्रयत्न केला जाईल.विभागीय उमेदवाराच्या तात्पुरत्या पदोन्नती च्या तारखेपासून एक वर्षानंतर आणि नव्याने प्रयत्न करूनही  थेट भरती द्वारे योग्य उमेदवार उपलब्ध नसल्यास, सक्षम अधिकारी, विभागीय उमेदवाराची नियुक्ती  कायमस्वरुपी करण्याच्या प्रश्नावर विचार करू शकतात."

वर उद्धृत केलेल्या स्थायी आदेशाच्या अवलोकनावरुन हे स्पष्ट होते , ते थेट भरतीच्या राखीव जागांशी संबंधीत उद्भवलेल्या परिस्थितीशी संबंधित आहे आणि हा आदेश असे गृहीत धरतो की -

( १) थेट भरतीसाठी योग्य उमेदवार उपलब्ध नाही;

(२) नियुक्तीसाठी  थेट भरतीद्वारे योग्य उमेदवार उपलब्ध होईपर्यंत, विभागीय उमेदवाराला तात्पुरती  पदोन्नती दिली जाऊ शकते;

(३) अशी तात्पुरती पदोन्नती  थेट भरतीद्वारे योग्य उमेदवार उपलब्ध होईपर्यंत टिकेल.

(४) पदाची पुन्हा जाहिरात करून  थेट भरतीद्वारे योग्य उमेदवार मिळवण्यासाठी नव्याने प्रयत्न करणे, हे अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे; आणि

(५) विभागीय उमेदवाराच्या तात्पुरत्या नियुक्तीच्या तारखेपासून एक वर्षानंतर आणि नव्याने प्रयत्न  केल्यानंतरही  थेट भरतीद्वारे योग्य उमेदवार उपलब्ध नसल्यास, सक्षम अधिकारी विभागीय उमेदवाराची  नियुक्ती नियमित बनविण्याच्या  प्रश्नावर विचार करू शकतात.

या आदेशाच्या अभ्यासातून असे दिसून येते की, विभागीय पदोन्नती समितीने सप्टेंबर, १९८५,२३ डिसेंबर, १९८६,१ फेब्रुवारी,१९८९ आणि ३१ डिसेंबर,१९९२ मध्ये अपीलकर्त्याचा विचार केला होता, परंतु तो नियमित पदोन्नतीसाठी योग्य आढळला नाही.ही स्थिती लक्षात घेता, अपीलकर्त्याला त्याच्या मूळ पदावर परत पाठवण्यात आले.वर नमूद केलेल्या स्थायी आदेशानुसार, तात्पुरत्या पदोन्नती वर नियुक्त केलेल्या उमेदवाराला दिलेला अधिकार असा आहे की, नव्याने प्रयत्न करूनही थेट भरती द्वारे योग्य उमेदवार उपलब्ध नसेल, तर त्याला कायम/नियमित पदोन्नतीसाठी विचारात घेतले पाहिजे.खरे तर, अपीलकर्त्यांचा नियमित पदोन्नतीसाठी विचार करण्यात आला होता, परंतु तो योग्य आढळला नाही; सबब, त्याची पदावनती करणे, हे स्थायी आदेश ३२ (अ) चे उल्लंघन करणारे आहे, असे म्हटले जाऊ शकत नाही.तथापि, आम्ही हे स्पष्ट करतो की, भविष्यात सदर पदाच्या पदोन्नतीसाठी अपीलकर्त्याचा कायद्यानुसार विचार करण्यापासून हा आदेश अधिकाऱ्यांना रोखू शकत नाही.

वरील प्रकरणाचा या दृष्टिकोनातून विचार केला असता, आम्हाला उच्च न्यायालयाच्या आक्षेपीत आदेशात काहीही बेकायदेशीरपणा आढळत नाही .या अपीलात कोणतेही तथ्य दिसत नाही आणि त्यानुसार ते फेटाळले जाते.खटल्यातील तथ्ये आणि परिस्थितीनुसार आम्ही खर्चाबाबत कोणताही आदेश देत नाही.याचिका फेटाळण्यात आली.

X-x-x-x

- अस्वीकरण –

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारांस त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x